## प्रेसनोट

आदेश.क्र.पोउआ/वाहतुक/10600/२०१७ पुणे शहर दिनांक 02/१२/२०१७

पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात वाहतुक सुरळित चालणेकामी पुणे नगर रोड, सोलापूर रोड, सातारा रोड, पुणे - मंबई रोड या रस्त्यांवर यापुर्वीच जड वाहनाना बंदी करण्यात आलेली आहे. सदरबाबतचे बंदी आदेश यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेले आहेत. दि.३०/११/२०१७ रोजी पासून जड वाहतुक करणा-या वाहनांवर कारवाई करणेकामी विशेष मोहिम चालू करण्यात आली आहे. जड वाहनांना ठरावीक वेळेत/पुर्ण वेळेत बंदी घातलेबाबत आदेश काढण्यात आलेली आहेत. तरी सुध्दा सदर वेळेत जी वाहने जड वाहतुक करीत असतील अशा वाहनांवर सक्त कायदेशीर कारवाई करण्यता येईल तसेच सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा करणा-या लक्झरी बसेस पार्किंग केल्या जात असतील अशा वाहनांवर देखील सक्त कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

विशेष मोहिमेअंतर्गत पुणे व पिंपरी चिंचवड शहरात दि.३०/११/२०१७ पासून ३८९ जड वाहनांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

तरी नागरिकांच्या माहितीसाठी महत्वाच्या रोडवरील बंदी आदेश खालील प्रमाणे आहेत.

### १.पुणे- नगर रोड

- **आदेश क्र ८७८९/१७ दि.३०/१०/२०१७** पुणे- नगर रोडवरील खराडी बायपास चौक ते शास्त्रीनगर चौक, लुप रोडवरील शास्त्रीनगर चौक ते आंबेडकर चौक या रोडवर सर्व प्रकारच्या स्थानिक अवजड वाहनांसह सर्व प्रकारच्या जड वाहनांना सकाळी ०८.०० ते दुपारी ११.०० व सायंकाळी १७.०० ते रात्री २१.०० वा. या वेळेत येणे जाणेकरीता प्रवेश बंद करणेत येत आहे.

### २.सोलापुर रोड

- **आदेश क्र ३५/२००६ दि. ०६/१०/२००६** अन्वये सोलापूर रस्त्यावरील १. बिशप स्कूल चौक ते पाण्याची टाकी (रेसकोर्स चौक) पर्यत एलफिस्टन रोडवर २. काहूर रोडवरील सैना पोलीस कार्यालय मार्ग एलफिस्टन रोडवर येणा-या सर्व वाहनांस ३. गुरुद्वारा रोडवरील गुरुद्वारा चौकातून सैना पोलीस कार्यालय मार्ग एलफिस्टन रोडवर जड वाहनांस बंदी करण्यात आलेली आहे.
- **आदेश क्र १९/२०१० दि. २०/०३/२०१०** अन्वये सोलापूर रस्त्यावरील खालील नमुद रस्त्यांवर जड वाहतूकीस व कॉन्ट्रॅक्ट कॅरेज प्रकारच्या प्रवासी वाहतुक बसेसकरीता (पुणे शहरातून निघाणाऱ्या व बाहेरुन पुणे शहराकरीताच येणाऱ्या लक्झरी बस वगळून) पुर्णवेळ प्रवेश बंदी करणेत येत आहे.
  १.भैरोबानाला चौक ते मोरओढा ते साधू वासवानी ब्रीज ते इन्स्पेक्शन बंगला चौक ते मंगलदास चौक ते जहॉंगीर चौक ते आर.टी.ओ. चौक ते इंजिनियरींग कॉलेज चौक.
  २.भैरोबानाला चौक ते गोळीबार मैदान ते सेव्हन लव्हज चौक.

### ३. सातारा रोड

- **आदेश क्र २७४/१९८९ दि. २७/०७/१९८९** अन्वये सातारा रस्त्यावरील १. सेव्हन लव्हज चौक ते जेधे चौक २. होल्गा चौक ते जेधे चौक पर्यत सर्व प्रकारच्या जड वाहनांस बंदी करण्यात येत आहे.
- **आदेश क्र ०४/१९९५ दि. २३/०१/१९९५** अन्वये सातारा रस्त्यावरील पुणे सातारा रोडवरील जूना जकातनाका ते गिरिधर भवन चौक दोन्ही बाजूने जड वाहनांस प्रवेश बंद करण्यात येत आहे.

### ४.पुणे मुंबई रोड

- **आदेश क्र ३५/२००४ दि. ०६/१०/२००४** अन्वये पुणे मुंबई रोडवरील दापोडी चौक ते शिवाजी पूतळा चौक ते दापोडी गाव पर्यत जड वाहनांस प्रवेश बंद करण्यात येत आहे.

### ५.पुणे शहर मध्यवर्ती भाग

- **आदेश क्र ३१/२०१० दि. १०/०५/२०१०** अन्वये पुणे शहर मध्यवर्ती भागात पुणे शहराचे मध्यवर्ती भागामध्ये खालील नमुद ठिकाणाहून येण्याकरीता, मंदगती वाहनांना प्रवास करण्यास व दरम्यानचे परिसरामध्ये पार्कींग करण्यास सकाळी ०८.०० ते १२.०० वा. व सायंकाळी १६.०० ते २०.०० वाजणेच्या दरम्यान मनाई करणेत येत आहे. मुंबई पुणे रस्त्यावरील
  - हॅरीस ब्रीज- इंजिनिअरींग कॉलेज चौक
  - राजीव गांधी ब्रीज, औंध ते गणेश खिंड रोड - पुणे विद्यापीठ चौक
  - बाणेर जकात नाका – पुणे विद्यापीठ चौक
  - शिवाजी चौक, पाषाण - अभिमानश्री सोसायटी –पुणे विद्यापीठ चौक
  - पौड फाटा – खंडोजीबाबा चौक
  - पौड फाटा - लॉ कॉलेज रोड

- राजाराम ब्रिज – सिंहगड रोड जंक्शन
- मित्रमंडळ चौक – पुरम चौक
- मार्केड यार्ड - जेधे चौक
- गंगाधाम - सेव्हन लव्हज चौक
- गोळीबार मैदान चौक – जेधे चौक
- भैरोबा नाला चौक – गोळीबार मैदान चौक
- भैरोबा नाला चौक - मोर ओढा चौक
- घोरपडी बाजार - मोर ओढा चौक
- ए.बी.सी फार्म चौक – कोरेगांव पार्क
- शास्त्रीनगर चौक – पर्णकुटी चौक
- गोल्फ क्लब चौक – गुंजन चौक
- पर्णकुटी चौक – चंद्रमा चौक - होळकर पुल
- बोपोडी चौक – खडकी बाजार - होळकर पुल

❖ **आदेश क्र २५/२०१० दि. २४/०४/२०१०** अन्वये पुणे शहरात सोलापूर / सासवड रोडने येऊन पिंपरी चिंचवड, मुंबई, नाशिक बाजुला जाणारे तसेच अहमदनगर बाजुला जाणारी वाहने किंवा विरूध्द बाजूने ये जा करणारी सर्व प्रकारची ट्रॅक्टर - ट्रेलर कॉम्बीनेशन, ट्रक - ट्रेलर कॉम्बीनेशन, अर्टीक्युलेटेड व्हेहीकल्स (मल्टी ॲक्सल वाहने, कंटेनर, मोठ्या आकाराच्या मालाची वाहतूक करणारी वाहने) तसेच पुणे शहराचे एका बाजूने येऊन शहरामध्ये काम नसणारी व दुसऱ्या बाजूला बाहेर जाणारी सर्व प्रकारची अवजड वाहने तसेच कॉन्ट्रॅक्ट कॅरेज प्रकारची प्रवासी वाहने (पुणे शहरामध्ये काम असणारी, अत्यावश्यक सेवेकरीता असलेली आणि स्थानिक अवजड वाहने वगळून) यांचे वाहतूकीस सकाळी ९.०० वा. ते सायं. २१.०० वाजेपर्यंत खराडी चौक ते पर्णकुटी चौक ते चंद्रमा चौक ते होळकर ब्रीज ते बोपोडी चौक ते नाशिक फाटा चौक पर्यत जड वाहनांस बंदी करण्यात आलेली आहे.

तरी जड वाहतुक करणा-या वाहन चालकांनी बंदी असलेल्या भागात जड वाहने नेवू नयेत अन्यथा त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

सही /-
(अशोक मोराळे)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतुक शाखा पुणे शहर

प्रति,

**मा. जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/-सदरची प्रेसनोट सर्व वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :-१) **पोलीस निरिक्षक,** प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

२) सहा. पोलीस आयुक्त, परिमंडळ - २, वाहतुक शाखा पुणे शहर.

३) **प्रभारी अधिकारी, सर्व** वाहतुक विभाग ,पुणे शहर.
२/-सदरबाबत म.न.पा. पुणे यांचेकडून **वरील निर्बधाप्रमाणे** फलक बसवुन घेवुन पुर्तता अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.

४) **पोलीस हवालदार गायकवाड ब.न. २७४९ वाहतुक शाखा, पुणे शहर.**
२/-सदरची प्रेस नोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे. त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

५) **पोलीस हवालदार, घाडगे ब. नं. ५३१४** वाहतुक शाखा, पुणे शहर.
२/- सदर प्रेसनोट ही सर्व संबंधीत वर्तमानपत्रांचे प्रतिनिधीच्या मेलवर पाठवावी, तसेच सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर अपलोड करावी.

६) **मा.सहाय्यक अभियंता** (ट्रॅफिक प्लॅनिंग), म.न.पा. पुणे.
२/-सदर ठिकाणी **वरील निर्बधाप्रमाणे** फलक बसविणेबाबतची कारवाई होणेस विनंती आहे.

प्रति :- **व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे**
२/-सदरचा आदेश राजपत्रात प्रसिध्द करुन त्याच्या ५ प्रती इकडील कार्यालयात पाठविण्याची विनंती आहे.